# कयाधू शेतकरी उत्पादक कंपनी, तोंडापूर
## सर्वसाधारण सभा दि.25/03/2022

आज दिनांक 25/03/2022 रोजी कंपनीचे अध्यक्ष ॲड. शिवाजीराव माने यांच्या अध्यक्षतेखाली कंपनीची सन 2021-22 वर्षातील सर्वसाधारण सभा तोंडापूर येथील संस्थेच्या कार्यालयावर बोलाविण्यात आली. या सभेसाठी कंपनीच्या एकूण 1247 भागधारकांना व सभासदांना बोलाविण्यात आले होते.

या सभेमध्ये खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

**विषय क्र.1** **मागिल सभेचे इतिवृताचे वाचून करुन ते कायम करणे.**

**विषय क्र 2** **कयाधू शेतकरी उत्पादक कंपनीकडून महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) अंतर्गत यंत्रसामुग्रीचा बियाणे उत्पादन कार्यक्रमासाठी उपयोग घेणे.**

सुचक :- महेंद्र शिवाजीराव माने
अनूमोदक :- आबासाहेब विठठ्ल कदम

सभेत हा विषय मांडल्यावर सभासद तथा संचालक श्री महेंद्र माने यांना सांगितले की, सन 2014-15 या कालावधीत कंपनीला महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्प (MACP) या प्रकल्पांतर्गत धान्य साफसफाई व प्रतवारी साठी यंत्रसामुग्री मिळालेली आहे. सध्या या यंत्रसामुग्रीचा उपयोग केवळ सभासदांचे धान्य साफसफाईसाठी वापरला जात आहे. तरी कंपनीकडून बियाणे उत्पादनाचा कार्यक्रम घेण्यात यावा व यासाठी या यंत्रसामुग्रीचा वापर करण्यात यावा. याकामी लागणारे मनुष्यबळ सभासदांच्या कुटूंबातील घेण्यात यावे, जेणेकरुन या भागात रोजगार निर्माण होईल.

**विषय क्र.3** **गटशेती योजनेतून सुरु केलेल्या हळद प्रक्रीया प्रकल्प या उपक्रमात तोंडापूर येथील कुशल व अकुशल मजूरांना रोजगार देणेबाबत..**

Kayadhu Farmers Producer Company Ltd.
Reg.No.CINU01403PN2014PTC153094
Tondapur, Tq.Kalamnuri Dist.Hingoli (M.S.)

सुचक :- विनोद प्रल्हाद जाधव
अनूमोदक :- सुनिल प्रल्हाद जाधव

सभेत हा विषय मांडल्यावर सभासद यांनी असा विषय मांडला की, सन 2017-18 ते 2021-22 या कालावधीत कृषी विभाग महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत कंपनीकडून गट शेती योजना हा प्रकल्प राबविल्या गेला आहे. या प्रकल्पात तोंडापूर क्लस्टर मधील 20 शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.

तोंडापूर येथे हा प्रकल्प सुरु झाला असून सहभागी 20 शेतकऱ्यांच्या कुटूंबातील सदस्यांना या प्रकल्पात कुशल व अकुशल कामगार म्हणून नियूक्त करण्यात यावे.

**विषय क्रं 4** सन **2022-23** या वर्षातील खर्च आराखडा मंजूर करणे.

सुचक :- संतोष उत्तम चव्हाण
अनूमोदक :- संदिप माणिकराव चव्हाण

अध्यक्ष श्री शिवाजीराव माने यांनी सन 2021-22 या वर्षात उपक्रमनिहाय झालेला खर्च सभेत मांडून नविन 2022-23 या वर्षाचा खर्च आराखडा सादर केला.

यावेळी कंपनीच्या एकूण सभासदापैकी **342** सभासद उपस्थित होते. वरील सर्व विषयांवर सभेत चर्चा होऊन अल्पोपहार व चहापानानंतर अध्यक्ष श्री शिवाजीराव माने यांच्या संमतीने सभेचे विसर्जन करण्यात आले.

**अध्यक्ष**
कयाधू शेतकरी उत्पादक कं.ली.
तोंडापूर